# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक २०.१०.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक २० ऑक्टोंबर २००८ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.३५ वा.वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त श्री.दिलीप बंड,नगर सचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालिका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
०२. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०३. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०४. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
०५. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर मोहम्मद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१३. स.स.श्री.जेम्स अंबिलढगे
१४. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१५. स.स.सौ.विजयाताई बनकर
१६. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१७. स.स.श्रीमती मसरत बेगम शरफोद्दीन
१८. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१९. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
२०. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
२१. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२२. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२३. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२४. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२५. स.स.सौ.इंगळे शकुंतला सांडुजी
२६. स.स.श्रीमती मिराबाई रामराव शिंदे
२७. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२८. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२९. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
३०. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
३१. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
३२. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३३. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३४. स.स.श्री.किशनचंद लेखराज तनवाणी

३५. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३६. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
३७. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३८. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३९. स.स.सौ.विणा सिध्द गजेंद्र
४०. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
४१. स.स.श्री.हाजी शेर खान अ.रहेमान
४२. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
४३. स.स.श्री.अशोक गोरखनाथ विरकर
४४. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४५. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४६. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिनसईद
४७. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
४८. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
४९. स.स.श्री.सलीम पटेल समशेर पटेल
५०. स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव
५१. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
५२. स.स.श्रीमती खान जहुराबी नासेर
५३. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५४. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
५५. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
५६. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५७. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५८. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५९. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
६०. स.स.डॉ.बिनवडे आशा उत्तमराव
६१. स.स.श्री.खुडे विजय किसनराव
६२. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
६३. स.स.श्रीमती जयश्री किवळेकर
६४. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६५. स.स.सौ.ससाणे सरिता अशोक
६६. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६७. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
६८. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६९. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७०. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७१. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
७२. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७३. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७४. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७५. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७६. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७७. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७८. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
७९. स.स.श्री.विनोद सोनवणे

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०४. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी

**चर्चा :**

श्री.अ.साजेद अ.सत्तार :महापालिकेत ठेकेदारी करणारे श्री.हबीबखाँ नुरखान यांचे नुकतेच ऱ्हदय विकाराने दुःखद निधन झाले श्रध्दाजंली अर्पण करावी त्यांनी महापालिकेचे विकास कामे केलेली होती त्यांना बील वेळेवर मिळत नाही म्हणून हा प्रकार घडला यास कोण जबाबदार आहे सत्य परीस्थिती काय,खुलासा करावा.

डॉ.भागवत कराड :त्यांचे मृत्यूशी महापालिकेचा संबंध येत नाही त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यास हरकत नाही. माझे अनुमोदन आहे.

श्री.संतोष जेजुरकर
श्री.संजय जगताप :फक्त श्रध्दांजली देण्यात यावी.

मा.महापौर :आताच सुचना केल्याप्रमाणे संबंधीत ठेकेदार यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात येते सर्वांनी उभे रहावे.

याच वेळी पै.श्री.हबीबखाँ नुरखान यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :अशी वेळ त्या ठेकेदारावर का आली त्यांचे बिल का देण्यात आले नव्हते ठेकेदाराची किती रक्कमेची बिले प्रलंबीत आहे. प्रशासनाकडून खुलासा घेण्यात यावा.

याचवेळी मा.महापौर डायस समोर स.सदस्य मोठमोठयाने बोलतात.

श्री.पुनमचंद बमणे :माझे वार्डात अनेक स्पील ओव्हरची कामे थांबलेली आहे त्या कामांना केव्हा सुरूवात करणार आहे माहिती घ्यावी.

श्री.संतोष खेंडके :गजानन महाराज मंदीर चौक पुंडलिक नगर ते जय भवानी चौक पर्यंतच्या रस्त्याचे काम सहा महिण्यापासून थांबलेले आहे कामच पूर्ण होणार नव्हते तर वर्क ऑर्डर का दिली काम का होत नाही माहिती घ्यावी योग्य माहिती मिळत नाही तोपर्यंत डायस समोर बसत आहे.

याच वेळी वार्डातील विकास कामे होत नसल्याने काही स.सदस्य मा.महापौर डायस समोर खाली बसतात मोठमोठयाने बोलतात.

मा.महापौर :सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. सर्वांच्या प्रश्नाचा खुलासा प्रशासनाकडून घेतला जाईल.

मा.महापौर यांचे डायस समोर स.सदस्य मोठमोठयाने विकास कामे व्हावी म्हणून मागणी करतात विविध घोषणा देतात.

मा.महापौर :सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवरून बोलावे. डायस समोर कुणीही उभे राहू नये.

मा.महापौर यांनी वारंवार सुचना देवूनही स.सदस्य आपआपल्या जागेवर बसत नाही घोषणा देणे चालू असते.

मा.महापौर : आजची सभा तहकूब करण्यात येते. तहकूब सभेची सूचना स्वतंत्ररित्या देण्यात येईल.

या बरोबरच आजची सभा तहकूब करण्यात आल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.

**औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (१६)**

**दिनांक २०/१०/२००८ रोजी आयोजीत सर्वसाधारण सभेतील**
**प्रश्नोत्तरे**

**श्री.अशरफ युनुस मोतीवाला,स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.३२ :**

विरोधी पक्षनेता दालनाचे पत्र क्र.६३/२००८ दिनांक १/८/०८ प्रमाणे श्री.सोमनाथ शेटे उपायुक्त यांच्याकडून सिटीएस नं.१२९६०/१०/१ याप्रकरणात चौकशी अहवालाची प्रती मागविण्यांत आली होती जे आतापर्यंत मिळालेली नाही याचे कारण काय?

**उपआयुक्त (सिडको) तथा चौकशी अधिकारी :**

**उत्तर :**

**प्रकरण : न.भू.क्र.१२९६० मौ.जाफरगेट येथील श्री.प्रेमचंद सुराणा व इतर यांचे सुधारित रेखांकन प्रकरणाची चौकशी**

मा.सभापती स्थायी समिती यांनी दि.२४.०७.२००८ रोजीच्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये दिलेल्या आदेशानुसार वरील प्रकरणाची प्राथमिक चौकशीत संबंधित विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेखा आधारे खालील आक्षेपार्ह मुद्दे व अनियमितता आढळून आली.

०१. या प्रकरणामध्ये सुधारीत रेखांकन प्रस्तावा सोबत दाखल करण्यात आलेले मालकी हक्काचे कागदपत्रे असे की, नगर भु-मापन कार्यालयाचे आखीव पत्रिका (पी.आर.कार्ड) व मिळकतीचा संपूर्ण मोजणी नकाशा जमीन मालकाच्या नावे असणे आवश्यक आहे ही बाब तपासण्यात आलेली दिसून येत नाही. विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.६.२.२ नुसार मालकी हक्काची प्रथम खात्री करणे नियमानुसार बंधनकारक आहे.

०२. शासन मंजुर विकास नियंत्रण नियमावली नियम क्र.६.२.१.२ नुसार कोणताही विकास परवानगीचा प्रस्ताव दाखल करतांना संपूर्ण मिळकतीच्या मालमत्ता करा बाबत व थकबाकी बाबत बेबाकी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदरील बाब प्रस्तावाच्या छाननीमध्ये तपासण्यात आल्याचे दिसून येत नाही.

०३. विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.१३.३ मध्ये रेखांकनातील खुल्या जागेचे निकष व बंधने देण्यात आली आहेत या नियमावलीतील उपनियम १३.३.१.२ नुसार खुल्या जागेचे आकारमान व बाजुंची मर्यादा यांचे प्रमाण निश्चित करण्यात आले आहे. खुल्या जागेची लांबी व रूंदी प्रमाणात असणे गरजेचे आहे व त्यास असलेला पोच रस्ता याबाबत निकष ठरविण्यात आलेले आहे. सुधारित रेखांकनाच्या छाननीत या नियमाक्डे पुर्णत: डोळेझाक करून अनियमित आकाराची नियमानुसार अनुज्ञेय न होऊ शकणारी खुली जागा मान्य करण्याची शिफारस केल्याचे आढळून येते. ही बाब तांत्रिक अधिकाऱ्यांच्या ज्ञानाचा अभाव अथवा हेतुपुरस्कर केलेली चुक आहे हे स्पष्ट होते.

०४. प्रस्तावित रेखांकनातील अनियमित आकाराची खुली जागा ज्याचा न.भु.क्र.१२९६०/१०/१ असा आहे. ही जागा भागश: विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ५४ ने बाधीत आहे. याबाबत पुर्वीच्या मंजुर रेखांकन नकाशावर स्पष्ट उल्लेख असतांना सुधारीत रेखांकन प्रस्तावात याबाबत तपासणी करण्यात आली नाही व कोणतीही टिपणी करण्यात आली नाही. विकास योजना प्रस्तावाबाबत दुर्लक्ष करणे ही बाब गंभीर आहे.

तसेच मुळ रेखांकनात खुली जागा म्हणून देय केलेला भुखंड न.भु.क्र.१२९६०/१३ हा मुख्य रस्त्यावर मोक्याच्या जागी व नियमित आकारात आहे. आता नव्याने प्रस्तावित खुली जागा न.भु.क्र.१२९६०/१०/१ ही वेडयावाकडया आकाराची अनियमित स्वरूपाची व कोणत्याही मुख्य रस्त्यावर (Frontage) नसलेली एखादया बोळीप्रमाणे आहे. ही बाब संचिकेमध्ये कोणत्याही स्तरावरील टिपणीत नोंदविली गेली नाही. तसेच मुळ रेखांकन खुल्या जागेचे क्षेत्र २५८३.१२ चौरस मीटर एवढे असून ही जागा महानगरपालिकेकडे वर्ग झालेली असतांना नवीन खुली जागा २३५८.०० चौरस मीटर क्षेत्राची म्हणजेच २२५.१२ चौरस मीटर क्षेत्र कमी करून मान्य करण्याचे शिफारस केली आहे. ही बाब देखील निश्चितच महानगरपालिकेच्या हिताच्या विरूध्द आहे.

०५. मंजुर रेखांकन आदेश क्र.एमसी/टीपीएस/एलवायटी/३५९/८२ दिनांक ११.०३.१९८२ मधील अट क्र.७ नुसार रेखांकनातील खुली जागा न.भु.क्र.१२९६०/१३ क्षेत्र २५८३.१२ चौरस मीटर नगरपरिषदेमध्ये (Vest) वर्ग झाली आहे म्हणजेच ही मालमत्ता नगरपरिषदेच्या मालकीची व नगरपालिकेमध्ये निहित असल्याने त्या मालमत्तेचे हस्तांतरण करता येत नाही तसेच त्याचे क्षेत्रफळ कमी करता येत नाही. या जमीनीची विल्हेवाट लावण्याकरीता महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे या संचिकेमध्ये सर्वसाधारण सभेच्या मान्यतेचा उल्लेख नाही.

०६. विधी सल्लागार यांनी दिलेले त्यांचे कार्यालयीन पत्र क्र.जा.क्र/म.न.पा./विधी/१२६७/२००३ दिनांक २०.११.२००३ नुसार न्यायालयाने दावा डिसमिस केल्याचे कळविले व मनाई हुकुम नाही. सदरील जागेवरील अतिक्रमण काढावे व मुटेशन करावे असे कळवूनही तत्कालीन सहाय्यक संचालक नगररचना, प्रशासकीय अधिकारी व मालमत्ता अधिकारी यांनी या पत्राची दखल घेतली नाही कोटयावधी रूपयाची मालमत्ता महानगरपालिकेच्या हातुन जाता कामा नये या भावनेतुन तत्परतेने दखल घेणे आवश्यक आसतांनाही विधि विभागाच्या पत्राकडे दुर्लक्ष करण्यात आले ही खेदजनक बाब आहे.

०७. सदरील प्रस्तावामध्ये मुखत्यारआम भारत म्हणून कागदापत्री स्वक्षऱ्या केल्याचे आढळते परंतु मुळ मालकांनी संबंधितांना मुखत्यारनामा दिला आहे काय तसेच ज्यांचे मुखत्यार आम आहे ती व्यक्ती आज हयात आहे किंवा नाही या बाबी काळजीपुर्वक तपासल्या गेल्या नाहीत असे दिसते. तसेच मुखत्यारनामा नोंदणीकृत नसुन तो फक्त नोटरीद्वारा प्रमाणित आहे. ही बाब सुध्दा योग्य नाही.

०८. संचिकेमध्ये पान क्र. ५४९सी/७७ मध्ये नोटीस जा.क्र.म.न.पा./नरवि/३१२/२००४ दि.०५.०२.२००४ मध्ये स्पष्टपणे कळविण्यात आले आहे की,

अ) प्रस्ताव नकाशा प्रतीवर सर्व मिळकत धारकांचे नाव नमुद करून स्वाक्षऱ्या करणे आवश्यक.

ब) दि.दा.क्र.८८/२००१ चा विचार करून प्रस्ताव दाखल करावा.

क) प्रस्ताव नकाशावर भुखंडाची मोजमापे, जमीनीच्या हद्दीची मोजमापे दर्शविणे आवश्यक, कलरकोड करणे आवश्यक.

ड) अस्तीत्वातील बांधकामातील खुलासा, बांधकाम परवानगी/भोगवटा प्रमाणपत्रा बाबत.

वरील महत्वाच्या मुद्दांसह इतर त्रुटींची पुर्तता करण्यास कळविण्यात आल्याचे दिसते त्यानंतर सदरील मुद्यांचा खुलासा न करता संचिकेमध्ये केवळ अर्जदाराच्या हिताचा विचार करून पुढील टिपणी झाल्याचे दिसते. वरील मुद्यांची पुर्तता न करता कार्यालयाने स्वतःहून जाहिर प्रगटन देणे, संबंधितांना युपीसीने नोटीस पाठवून कागदोपत्री पुरावे तयार करण्याचा प्रयत्न करणे ही गोष्ट संबंधितांच्या महानगरपालिका संस्थेशी असलेल्या सचोटी व कर्तव्य परायणता या संशय घेण्याइतपत गंभीर आहे.

०९. नगर भुमापन क्रमांक १२९६०/१३ क्षेत्रफळ २४९४.५० या भुखंडाच्या आखीव पत्रिकेवर खुली जागा लेआऊट मधील अशी नोंद आहे. व ही नोंद २८,१२,१९८२ रोजी दिलेल्या रेखांकन आदेशानुसार घेण्यात आल्याचे नमुद केले आहे. करीता सदरील (Recreational Open Space) खुली जागेच्या मालकी व वापराबाबत कोठेही संदिग्धता नव्हती केवळ या खुल्या जागेच्या नोंदी सोबत मुळ जमीन मालकाचे नांव नगर भुमापन कार्यालयातील कर्मचाऱ्याच्या चुकीने कमी करण्यात आले नाही याबद्दल महाराष्ट्र महसुल संहिता १९६६ चे कलम १५५ नुसार मा.जिल्हाधिकारी यांना विनंती करून आखीव पत्रिकेतील या नोंदी बाबत दुरूस्ती करून घेणे शक्य होते परंतु तत्कालीन संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी महानगरपालिकेच्या हिताचा विचार न करता अर्जदारास महानगरपालिकेची जागा परत देण्याच्या दृष्टिने टिपणी केल्याचे दिसून येते याबाबत सखोल चौकशीची गरज वाटते.

१०. मंजुर रेखांकनातील अटी व शर्तीनुसार तसेच संबंधित जमीन मालकांनी रेखांकन मंजुरीचे प्रस्ताव स्टॅम्प पेपरवर दिलेला करारनामा यामध्ये असलेल्या उल्लेखाप्रमाणे या रेखांकन स्वयं:विकास पध्दतीने (Self Devlopment) करण्याची हमी दिली आहे. या लेआऊटमध्ये बेटरमेंट चार्जेस भरण्यात आले नाहीत. परंतु विकासाची सर्व कामे कोणी व केव्हा केली याबाबत संचिकेत कोणतीही टिपणी नाही. बेटरमेंट चार्जेस जमा न करता महानगरपालिकेने विकास कामे केली असल्यास त्याचा निष्कारण बोजा महानगरपालिका तिजोरीवर पडला काय याची तपासणी होणे आवश्यक वाटते.

११. प्रस्तावित सुधारित रेखांकन नकाशात खुल्या जागेत दोन बाजुने प्रस्तावित पोच रस्ते दाखविले आहेत. परंतु दोन्ही बाजुने प्रस्तावित केलेले रस्ते पोच रस्ते होऊ शकत नाही कारण पुर्व बाजुस रेखांकनातील भुखंडातून पोच रस्ता दाखविला असून त्यामध्ये रेखांकनातील मुळ भुखंडाचे क्षेत्र कमी होत आहे. व या भुखंड धारकाची संमती प्रस्तावित रेखांकन नकाशावर नाही तसेच संचिकेत याबाबत कोणत्याही स्तरावर स्पष्ट अहवाल नाही. पश्चिम बाजूस असलेल्या १५ मीटर विकास योजना रस्ता व रेखांकनाची जागा यामधील नियोजीत पोच रस्त्याचे क्षेत्र अर्जदाराच्या मालकीचे नाही करीता हा देखील पोच रस्ता होऊ शकत नाही. मुळ मंजुर रेखांकनात रस्त्याची रूंदी प्लॉट क्र.९ च्या पुर्वेस १० मीटर होती आता ती ९ मीटर करण्यात आली आहे. या प्रकरणात कार्यालयाने वृत्तपत्रात जाहिर प्रगटन देऊन मुळ रेखांकनात कोणताही बदल केला नसल्याचे जाहिर केले आहे तथापी प्रत्यक्षात वरील प्रमाणे अनेक बदल करून विसंगती निर्माण केली आहे. तसेच कार्यालयाने स्वतःच्या खर्चाने याबाबत जाहिर प्रगटन देणे ही बाब देखील योग्य वाटत नाही.

वरील सर्व आक्षेपार्ह बाबी लक्षात घेता या सुधारीत रेखांकन प्रस्तावाचे प्रकरण हाताळतांना कार्यालयाच्या विविध स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांनी निष्काळजीपणा, वस्तुनिष्ठ माहिती लपविणे,तसेच महानगरपालिकेचा हिताचा विचार न करणे व महानगरपालिकेच्या मालमत्तेला क्षति पोहोचवणे या चुका केल्या आहेत. याबाबत जबाबदारी निश्चित करून त्यांच्या चुकांच्या प्रमाणात शास्ती लावण्याची आवश्यकता आहे जेणेकयन संबंधिताकडून किंवा इतरांकडून वरील प्रमाणे गंभीर चुका होऊ नयेत या करीता चुका करणाऱ्यांच्या चुकांवर पांघरूण न घालता त्यांना शासन करणे संस्थेच्या/सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. करीता प्रकरणात सखोल चौकशी होऊन जबाबदारी निश्चित करण्या करीता या प्रकरणाचे मुख्य लेखा परिक्षक महानगरपालिका यांचेकडून लेखा परिक्षण होणे देखील आवश्यक आहे असे मत आहे.

**<u>प्रश्न क्र.३३ :</u>**

विरोधी पक्षनेता दालनाचे पत्र क्र.६०/२००८ दिनांक ३०/७/०८ प्रमाणे आरोग्य अधिकारीना श्री.जावरे प्रकल्प संचालक यांचे न्हदय रोगाचे उपचारासाठी ४४५९६९/- वैधकिय देयक अदा करण्यात आले ते कोणत्या नियमानुसार देण्यांत आले याबाबत कागदपत्रासह माहिती मागीतली असता आतापर्यंत देण्यात आलेली नाही याचे कारण काय?

**<u>आरोग्य वैद्यकीय अधिकारी</u>**

**<u>उत्तर</u>**

वैद्यकीय परतावा अधिनियम शासन निर्णय क्र.एएमजी २००५/९/प्र.क्र.१/आरोग्य ३,मंत्रालय,मुंबई व मनपाचे अधिनियम गंभीर आजार अ.क्र.३ नुसार ॲन्जिओ प्लास्टी शस्त्रक्रियेसाठी रूपये १,५०,०००/- अग्रीम देण्याची

**<u>प्रश्न क्र.३४ :</u>**

विरोधी पक्षनेता दालनाचे पत्र क्र.५६/२००८ दिनांक १८/७/०८ प्रमाणे उप संचालक नगर रचना मनपा यांना औरंगाबाद शहराची डिपी.रिपोर्ट बुक मिळण्यासाठी पत्र देण्यात आले होते सदरील रिपोर्ट आतापर्यंत का देण्यात आली नाही?

**<u>प्रश्न क्र.३५ :</u>**

विरोधी पक्षनेता दालनाचे पत्र क्र.५४/२००८ दिनांक ५/७/०८ प्रमाणे लेखाधिकारी यांना पत्र देऊन माहिती मागविली असता जी माहिती आतापर्यंत का देण्यात आलेली नाही याचा खुलासा करण्यात यावा?

**<u>प्रश्न क्र.३६ :</u>**

विरोधी पक्षनेता दालनाचे पत्र क्र.५१/२००८ दिनांक ४/७/०८ प्रमाणे अति.शहर अभियंता यांना माहिती मिळविण्यासाठी देण्यात आलेल्या पत्राचे उत्तर आतापर्यंत प्राप्त झालेले नाही याचे कारण याचा खुलासा व्हावा.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद